# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


**महत्वाचे/ईमेलद्वारे**

क्रमांक : प्रनिप्रा/प्र.क्र. ३४९/प्रवेश-२०२४/प्र.शु./प्रवेश-मान्यता/422 दिनांक 22 APR 2025

## परिपत्रक

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
५) संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण परिषद व संशोधन, पुणे.
६) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.

**विषय:** **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालकांनी प्रमाणित केलेले प्रवेश "मान्यता मान्यता प्रस्ताव" सादर करण्याबाबत.**

**संदर्भ:** **१) मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(च) मधील निर्णय.**
**२) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे क्रमांक प्रनिप्रा/प्र.क्र.३४९/प्रवेश-२०२४/प्र.शु./प्रवेश-मान्यता/६१५९, दिनांक १७/१०/२०२४ रोजीचे परिपत्रक.**
**३) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे क्रमांक संकिर्ण २२२४/प्र.क्र. ३४९/प्रनिप्रा/६१९६, दिनांक ३१/१०/२०२४ रोजीचे पत्र.**
**४) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदी.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियमातील कलम ९(५) मधील तरतूदीन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या संदर्भ क्रमांक २ व ३ वरील पत्रान्वये प्रवेश बंद दिनांकानंतर "प्रवेश मान्यता प्रस्ताव" सादर करण्याबाबत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना कळविण्यात आले होते. परंतू अद्याप अनेक महाविद्यालयांनी त्यानुसार कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

या अनुषंगाने मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ व १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्याप शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेले प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास सादर केले नाही, अशा महाविद्यालयांना दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पर्यंत सदरील प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. तद्नंतर विलंबाने सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावावंर अधिनियम २०१५ मधील कलम २० अन्वये खालील प्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे,-

| अ. क्र. | कालावधी | दंडाचा तपशील |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत | दंड नाही |
| २. | दिनांक १/०७/२०२५ ते ३१/०७/ २०२५ | रुपये एक लाख |
| ३. | दिनांक १/०८/२०२५ ते ३१/०८/ २०२५ | रुपये तीन लाख |
| ४. | दिनांक १/०९/२०२५ ते ३०/०९/२०२५ | रुपये पाच लाख |

दिनांक ३०/०९/२०२५ रोजी नंतर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील कोणत्याही व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांमार्फत "प्रवेश मान्यता प्रस्ताव" स्विकारला जाणार नाही.

प्राधिकरणाच्या उक्त निर्णयानुसार सर्व संबंधित संचालकांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रमाणित केलेला प्रस्ताव दिनांक ३०/०६/२०२५ पूर्वी त्यांना प्राप्त होईल, अशा पध्दतीने प्रवेश पडताळणी/छाननीच्या कामकाजाचे नियोजन करणे आवश्यक राहील. तसेच दंडात्मक कारवाई झाल्यास सदरील दंड हा महाविद्यालयांनी त्यांच्या खातात्यून अदा **करणे बंधनकारक राहील**. प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या उक्त निर्णयाचे तंतोतंत पालन करणे, ही सर्व संबंधितांची जबाबदारी आहे, याबाबत गांर्भीयाने नोंद घ्यावी.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
सदस्य सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित,-
अधिष्ठाता/प्राचार्य, सर्व संबंधित व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांची महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

D:\Jayant\Schedule_Verification2024.docx